**प्रेस नोट** **दिनांक २५/०४/२०१९**

## विश्रांतवाडी पोलीस स्टेशन,पुणे

## हरविलेल्या गाडीचा शोध घेवुन मुळ मालकाचे ताब्यात दिली

दिनांक २५/४/२०१९ रोजी सकाळी ११ वा आळंदी रोड पोलीस चौकी येथे वाहन चोरी तक्रार देणेकामी महीला नामे शैला मुर्ती रा कस्तुरबा हौसिंग सोसायटी. हे आले असता सपोनि दरवडे यांनी लागलीच तपास पथकातील कर्मचारी यांच्याशी संपर्क साधुन त्यांना सदर वाहन चोरी माहीती दिली. व सी.सी.टी.व्ही चेक करण्यास सांगितले, सदर महीलेची चौकीत तक्रार नोंद करित असतानाच तपास पथकातील पो.शि पठाण यांनी माहीती दिली की,त्यांनी नमुद अँक्टीव्हा ही कुमार समृध्दी सोसायटी समोर आहे. पो.शि पठाण व पो.शि मोरे यांनी सदरची गाडी आळंदी रोड चौकीस आणुन चौकी प्रभारी अधिकारी सपोनि दरवडे यांच्या ताब्यात दिली. त्यांनी सदरची गाडी मालक यांच्या ताब्यात दिली आहे. तक्रारदार यांनी पोलीसांनी तात्काळ गाडीचा शोध घेतल्याने त्यांचे अभिनंदन केले.

सदरची कामगिरी वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरुण आव्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि दरवडे, पो.शि रिहान पठाण व पो.शि प्रफुल्ल मोरे विश्रांतवाडी पोलीस स्टेशन यांनी केली आहे.